**स्वातंत्र्याच्या शताब्दीत मिरा भाईंदरचा कायापालट होणार**

**२०४७ साली सर्वार्थाने स्वयंपूर्ण व्हावे मिरा भाईंदर**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने मिरा भाईंदर @२०४७ या दोन दिवसीय परिसंवादाचे आयोजन दिनांक 9 आणि 10 फेब्रुवारी दरम्यान करण्यात आले होते. भारतरत्न, गानसम्राज्ञी लता मंगेशकर नाट्यगृहात गेल्या दोन दिवसात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध क्षेत्रातील तज्ज्ञ मान्यवरांनी शिक्षण, महिला सक्षमीकरण, सिटी ब्रँडिंग, शहर सुरक्षा, पर्यावरण आणि आरोग्य यांसारख्या विविध विषयांवर, महानगरपालिकेची २०४७ पर्यंतची वाटचाल यावर मार्गदर्शन केले. एनएमआरडीए महानगर आयुक्त श्री.सतिशकुमार खडके, वसई विरारचे महानगरपालिका आयुक्त श्री.अनिलकुमार पवार आणि मिरा भाईंदरचे महानगरपालिका आयुक्त श्री.संजय श्रीपतराव काटकर यांच्या उपस्थितीत मिरा भाईंदर @२०४७ कार्यक्रमाचे उद्घाटन ९ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी १० वाजता पार पडले.

उदघाटन सत्रात महीला सबलीकरणावर प्रसिद्ध लेखक,वक्ते अरविंद जगताप यांनी, पुरुषांच्या दृष्टिकोनातून महीला सक्षमीकरण मांडले. पुरुषांनी आपला दृष्टिकोन बदलला तर महिला सक्षमीकरण करण्याची गरज देखील राहणार नाही, महिलांनी देखील निर्णय प्रक्रियेत भाग घ्यावा. “ज्या नवऱ्याला बाजारातून मेथीची जुडी निवडता येत नाही, त्याला विचारून मतदान करू नका” असं देखील जगताप यांनी मांडलं. त्यानंतर विनया शेट्टी यांनी महिलांसाठी डिजिटल सबलीकरण या विषयावर तर प्रीथी मारोली यांनी नेतृत्व करणाऱ्या महिलांची भूमिका या विषयांवर आपले विचार मांडले. दुसऱ्या सत्रात मार्केटिंग गुरु आणि टेडएक्सचे वक्ते श्री.तरूनसिंग चौहान यांनी शहराच्या विकासात शाश्वत शहर ब्रँडिंग या विषयावर भाष्य केले. तर पहिल्या दिवसाच्या शेवटच्या सत्रात महाराष्ट्राचे निवृत्त पोलीस महासंचालक श्री. डी. सिवानंदन यांनी सुरक्षित शहर ही संकल्पना विस्तृत करून सांगितली. त्यांचे २६/११ वेळीचे अनुभव आणि मुंबई शहराचे पोलीस आयुक्त असतानाचे वेगवेगळे अनुभव त्यांनी लोकांना सांगितले.

दि १० फेब्रूवारी शनिवार रोजीच्या सकाळच्या सत्राची सुरुवात सांस्कृतिक कार्यक्रमाने झाली. तर दुसऱ्या सत्रात भारत सरकारचे माजी परराष्ट्र सचिव आणि राजदूत असलेले डॉ.ज्ञानेश्वर मुळे यांनी पर्यावरण व युवक या विषयावर आपले विचार व्यक्त केले. दुपारच्या सत्रात एमजीएम विद्यापीठ आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू तथा शिक्षणतज्ज्ञ श्री. सुधीर गव्हाणे यांनी तंत्रज्ञानाचा शिक्षणावरील प्रभाव या विषयावर, तर जागतिक दर्जाचे शिक्षणतज्ज्ञ आणि टेडएक्सचे व्याख्याते श्री. फ्रान्सिस जोसेफ यांनी,शैक्षणिक धोरण आणि सुधारणा या विषयावर मार्गदर्शन केले. शेवटच्या सत्रात प्रसिद्ध नवजात बालरोग तज्ज्ञ, लेखक, वक्ते डॉ.अमोल अन्नदाते यांनी शाळेवर आधारित आरोग्य शिक्षण कार्यक्रमाची परिणामकारकता या विषयावर प्रेक्षकांशी संवाद साधला. माननीय आमदार प्रताप सरनाईक, आमदार गीता जैन आणि माजी आमदार श्री मुझफ्फर हुसैन यांनी देखील कार्यक्रमाला हजेरी लावून, या अभिनव उपक्रमाबद्दल महानगरपालिकेची प्रशंसा केली. या परिषदेमधील उल्लेखनीय बाब म्हणजे महानगरपालिकेचे अधिकारी श्री अनिकेत मानोरकर, श्री संजय शिंदे, श्री दिपक खांबीत आणि श्रीमती कल्पिता पिंपळे यांनी प्रत्येक विषयावर संवादापूर्वी पॉवर पॉईट सादरीकरण केले. महापालिका

आयुक्त श्री संजय श्रीपतराव काटकर यांनी समारोप प्रसंगी, हा या परिषदेचा शेवट नसून सुरुवात आहे आणि परिषदेत व्यक्त केलेल्या प्रत्येक वक्तव्याचे डॉक्युमेंटेशन करून, त्यावर काम करू तसेच प्रत्येक वर्षी ठरवलेल्या ध्येयांचा आढावा घेऊ, असे सांगितले.समाजातील विविध स्तरातून नागरिकांनी या कार्यक्रमासाठी हजेरी लावली होती आणि युट्यूब फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून हजारो प्रेक्षकांनी या कार्यक्रमाचा आस्वाद घेतला